## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिकेची भाडेपट्ट्याने दिलेली शाळा क्र.२१ व शाळा क्र.२५ ताब्यात घेणेबाबत.

प्रस्ताव :

भारत सरकार शिक्षण मंत्रालय, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग यांचेकडील दि.२८/३/२०२३ चे पत्राने PM SHRI (PM School For Rising India) योजने अंतर्गत शाळा क्र.४६ रा.शाहू पुतळा परिसर ही शाळा सुधारणेस मंजुरी मिळाली आहे.

शाळा क्र.४६ ची PM SHRI (PM School For Rising India) योजने अंतर्गत दुरुस्ती होणार असलेने प्रशासन अधिकारी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ यांनी शाळा क्र.४६ साठी १२ वर्ग खोल्यांची आवश्यकता असलेने सन २०२३/२०२४ या शैक्षणिक वर्षासाठी १२ वर्ग खोल्या असणारी आरसीसी इमारत व सन २०२४/२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी १० वर्ग खोल्या इमारत मागणी केली आहे.

श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसा. तर्फे अध्यक्षा सौ. मेघा अ. बेलेकर यांना शाळा क्र. २१ व सर्वोदय विद्या केंद्र तर्फे अध्यक्ष इस्माईल आब्बास समडोळे यांना शाळा क्र. २५ यांना भाडेपट्ट्याने दिलेल्या शाळेच्या वर्ग खोल्यांची मुदती संपलेल्या असलेने तसेच वरील भारत सरकार शिक्षण विभाग यांच्या पत्रानुसार या शाळा क्र.४६ PM SHRI (PM School for Rising India) योजनेतंर्गत सुधारीत करणेत येणार असल्याने शाळा क्र.४६ साठी वर्ग खोल्या देणेसाठी शाळा क्र.२१ व शाळा क्र.२५ या खाली करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणेबाबत इकडील जा.क्र. इमनपा/२१/२२२/२०२३ दि. ०४/०५/२०२३ व जा.क्र. इमनपा/२१/२२१/२०२३, दि.०४/०५/२०२३ ने श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसायटी तर्फे सौ. मेघा अ. बेलेकर व सर्वोदया विद्या केंद्र तर्फे अध्यक्ष ईस्माईल आब्बास समडोळे इचलकरंजी याना कळविणेत आलेले होते.

श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसा. व सर्वोदय विद्या केंद्र यांनी सदर नोटीसीच्या अनुषगाने नोटीसीस उत्तर कळविले होते. याबाबत प्रस्ताव सादर केला असता मा. यांनी नियमानुसार पुढील कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार संबंधीत श्री. दानम्मादेवी एज्यु. सोसायटी इचलकरंजी व सर्वोदय विद्या केंद्र यांची दि. २०/०६/२०२३, दि. २७/०६/२०२३ व दि. ०४/०७/२०२३ इ. रोजी शाळेच्या वर्गखोल्या ताब्यात देणेबाबत सुनावणी घेणेत आली.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दि.२६/४/२०२३ च्या अधिसूचनेनुसार नियम ६ भाडेपट्टा कालावधी महानगरपालिका आणि भाडेपट्टाधारक यांनी परस्पर सामंजस्याने भाडेपट्ट्याचा अथवा नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करावा. भाडेपट्ट्याचा कालावधी प्रथमत: दहा वर्षापर्यंत असेल, भाडेपट्ट्याचा एकूण कालावधी तीस वर्षापेक्षा जास्त नसावा अशी तरतुद आहे.

उक्त प्रारुप नियमामध्ये जागा बदलून देणेबाबत तरतुद नमूद नाही. सदरची जागा PM SHRI (PM School For Rising Idia) योजने अंतर्गत शाळा क्र.४६ ला १२ खोल्या उपलब्ध करुन देणे आवश्यक असलेने सुनावणी घेतलेली आहे.

त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून केवळ अपवादात्मक परिस्थिती पाहून श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसा. या शैक्षणिक संस्थेच्या वापरात असणा-या वर्ग खोल्यास चालू शैक्षणिक वर्ष ( सन २०२३/२०२४) साठी मुदतवाढ देणेस व सर्वोदय विद्या केंद्र यांना शाळा क्र.४६ च्या वापरात असणा-या खोल्या चालू शैक्षणिक वर्षासाठी ( सन २०२३/२०२४) वापरास देणेबाबत व चालू शैक्षणिक वर्ष (सन २०२३/२०२४) संपताच १५ दिवसात उक्त मिळकतींचे देय असणारे भाडे व इतर कर भरणा करुन घेऊन श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसा. व सर्वोदय विद्या केंद्र यांचेकडून वर्ग खोल्या महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठी प्रशासकीय ठराव होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३२/२०२३** दि.२४/८/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून **केवळ अपवादात्मक परिस्थिती पाहून** श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसा. या शैक्षणिक संस्थेच्या वापरात असणा-या वर्ग खोल्यास चालू शैक्षणिक वर्ष (सन २०२३ / २०२४) साठी मुदतवाढ देणेस व सर्वोदय विद्या केंद्र यांना

CamScanner

शाळा क्र.४६ च्या सद्या वापरात असणा-या खोल्या चालू शैक्षणिक वर्षासाठी ( सन २०२३/२०२४) वापरास देणेबाबत व चालू शैक्षणिक वर्ष (सन २०२३/२०२४) संपताच १५ दिवसात उक्त मिळकतींचे देय असणारे भाडे व इतर कर भरणा करुन घेऊन श्री. दानम्मादेवी एज्युकेशन सोसा. व सर्वोदय विद्या केंद्र यांचेकडून वर्ग खोल्या महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस मंजुरी देणेत येत आहे. याकामी श्री.दानम्मादेवी एज्युकेशन सोसायटी व सर्वोदय विद्या केंद्र यांचेकडून सन २०२४/२०२५ चे शैक्षणिक वर्षासाठी नव्याने करार करणेत यावा व सदरची मुदत चालू शैक्षणिक वर्षासाठी असलेबाबत व पुन्हा मुदतवाढ देणेत येणार नाही ही अट करारामध्ये नमूद करणेत यावी. सद्या सर्वोदय विद्या केंद्र यांचे ताब्यात असणा-या वर्ग खोल्या व शाळा क्र.२५ ची सर्व इमारत शाळा क्र.४६ यांना वापरास देणेत यावी.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

25/08/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हातकणंगले यांना विकास कामासाठी लागणारी उपयुक्त् कागदपत्रे सादर करणेबाबत.

प्रस्ताव :

उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हातकणंगले यांनी इचलकरंजी येथील प्र.क्र. २४ महेश हौसिंग सोसायटी काडाप्पा मळा, कित्तुरे मळा पर्यंत आर.सी.सी. गटार करणे या कामासाठी महानगरपालिकेची NOC व भविष्यात देखभाल दुरुस्ती बाबत व इतर कागदपत्रांची मागणी केलेली आहे. या अनुषंगाने सदरच्या कामाची जागा मनपा हद्दीत नसलेने व मिळकत पर्यवेक्षक यांचेकडील अभिप्रायानुसार सदर जागेची मालकी महानगरपालिकेची नसल्याने याबाबत उपरोक्त् NOC देण्यात आलेली नव्हती. आता सदरची गटर करणे आवश्यक असल्याचे व इचलकरंजी शहरातील सांडपाणी याच गटारीमधुन वाहुन जात असलेचे तसेच या गटारीची वार्षिक साफसफाई महानगरपालिकेकडून होत असलेचे नमुद करुन व याकामी शासनाकडून निधी उपलब्ध् झाल्याने श्री. अविनाश गुलंचद कांबळे, यांनी दि. २१/०८/२०२३ रोजीचा अर्ज देवुन या कामी NOC ची मागणी केलेली आहे. समक्ष जागेची पाहणी केली असता खालीलप्रमाणे वस्तूस्थिती आहे.

१. प्रस्तावित गटारीचे काम हे महेश् कॉलनी जवळील काडाप्पा मळा ते कित्तुरे मळा या अंदाजे ११०० मीटर लांबीचे आहे.
२. सदर गटार (१) महालींग मळा (२) जयकुमार काडाप्पा मळा (३) अरुण मणेरे घर (४) वसंत पाटील मळा (५) बाटू पाटील मळा (६) बाबासो पाटील मळा (७) आप्पासाहेब केटकाळे मळा (८) कित्तुरे मळा क्षेत्रामध्ये अंतर्भुत आहे.
३. यातील महालींग पाटील मळा येथील बाजीराव पाटील घर ते जयकुमार काडाप्पा मळा पर्यंत अंदाजित १७५ मी. लांबीची सद्यस्थितीतील नादुरुस्त दगडी बांधीव गटार आहे.
४. त्यानंतर जयकुमार काडाप्पा मळा ते कित्तुरे मळा पर्यंत ओघळ स्वरुपात गटर आहे.
५. उपरोक्त क्र. २ मधील क्षेत्र हे महानगरपालिका हददीबाहेरील असुन या गटारीची ओघळ स्वरुपाची जागा या खाजगी मालकीच्या असलेचे प्रत्यक्ष जागेवर माहितीद्वारे समजते.
६. प्रस्तावित गटारीचे अंतिम ठिकाण कित्तुरे मळा हा परिसर मनपा हददीमध्ये आहे.
७. इचलकरंजी शहरातुन निर्गत झालेले सांडपाणी या गटारीचे माध्यमातुन वाहुन सरते शेवटी पुन्हा महानगरपालिका हददीतील ओढयामध्ये निर्गत होते ही वस्तुस्थिती आहे.
८. सदरची गटार आर.सी.सी. स्वरुपात बांधणे हे इचलकरंजी शहरातील सांडपाणी निर्गत होणेचे दृष्टीने अत्यावश्यक बाब आहे.

याकामी शासनाचा प्राप्त निधी परत गेल्यास महानगरपालिका हददीतील सांडपाणी निर्गत होणेच्या आरोग्यदायी बाबीवर परिणामदायक ठरु शकते.

सबब प्र.क्र. २४ महेश हौसिंग सोसायटी काडाप्पा मळा, कित्तुरे मळा पर्यंत आर.सी.सी. गटार करणे हे विकास काम होणेच्या अनुषंगाने मनपा. हददीबाहेरील क्षेत्रातील असलेने प्रस्तावित गटारीच्या जागेच्या मालकीची खात्री महानगरपालिकेकडून करणेत आली नसुन ती कार्यान्वयीन यंत्रणेकडून करणे व या संदर्भातील भविष्यातील वाद विवाद याबाबत मनपा जबाबदार राहणार नही या अटीवर ना हरकत दाखला देणे व देखभाल दुरुस्ती बाबतचे प्रमाणपत्र देणे योग्य राहील. असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.३३/२०२३** **दि.२९/८/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवून प्र.क्र. २४ महेश हौसिंग सोसायटी काडाप्पा मळा, कित्तुरे मळा पर्यंत आर.सी.सी. गटार करणे कामाचे क्षेत्र मनपा हददीबाहेरील असुन सदर हददीतील सांडपाणी निर्गत होणेस व शासनाकडून प्राप्त निधी परत जावु नये, तसेच इचलकरंजी शहरातुन निर्गत झालेले सांडपाणी हे या गटारीचे माध्यमातुनच वाहुन सरते शेवटी पुन्हा महानगरपालिका हददीतील ओढयामध्ये निर्गत होते ही वस्तुस्थिती आहे.

तरी प्रस्तावित गटारीच्या जागेच्या मालकीची खात्री ही महानगरपालिकेकडुन करणेत आलेली नसुन ती कार्यान्वयीन यंत्रणेकडुन करणेत यावी या संदर्भातील भविष्यातील वाद विवाद यास इचलकरंजी महानगरपालिका जबाबदार राहणार नाही या अटीस अधिन राहुन प्र.क्र. २४ महेश हौसिंग सोसायटी काडाप्पा मळा, कित्तुरे मळा पर्यंत आर.सी.सी. गटार करणे कामास ना हरकत दाखला व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र देणेस मान्यता देणेत येत आहे.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

29/08/2023

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : श्री. १००८ भ. महावीर जयंती उत्सव मंडळ, इचलकरंजी यांची दवाखाना इमारत बदलाबाबत.

प्रस्ताव :

अध्यक्ष श्री. १००८ भ. महावीर जयंती उत्सव मंडळ, इचलकरंजी यांनी इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या मोठे तळे येथील मंडळामार्फत सुरु असलेल्या भ. महावीर धर्मदाय दवाखान्यासाठी मोठे तळे येथील जागे ऐवजी गावभाग येथील विठ्ठल मंदिर समोरील गेस्ट हाऊस इमारती मधील तळमजला डागडुजी करुन देणेस विनंती केली आहे.

श्री. १००८ भ. महावीर जयंती उत्सव मंडळ, इचलकरंजी ट्रस्ट अॅक्ट खाली असलेने मोफत आयुर्वेदीक औषधालयासाठी मोठया तळयाजवळील जागा सदरचा दवाखाना असे पर्यंत नॉमिनल भाडयाने देण्यात यावी असा मे.कौ.ठ.न. २४१ / दि.२९/१२/१९७५ ने मंजुरी देणेत आली आहे. सदरचा नाममात्र व दिर्घ मुदतीने जागा देणेबाबत झालेल्या ठरावास मा. संचालक नगरपालिका प्रशासन सचिवालय, मुंबई क्र. ३२ यांचेकडे जा.क्र. टॅक्स/२९३७/७६७७ दि. १५/११/१९७६ मान्यतेसाठी सादर केला. त्यास उपसचिव नगरपरिषद संचालनालय यांनी नं. MCP २७७६/९४/CR-६३/D-१ दि. ०६/१२/१९७६ ने नाममात्र रु. १/-भाडयाने आयुर्वेदीक दवाखाना मोफत चालविणेसाठी ७ वर्षासाठी अथवा जोपर्यंत मंडळा तर्फे दवाखाना चालु असेपर्यंत देणेस मान्यता दिली आहे.

मोठे तळे परिसराचे महानगरपालिकेमार्फत सुशोभिकरण करणेत येणार आहे. सबब सदरची जागा खाली करुन घेणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी सुचविलेप्रमाणे महानगरपालिका मालकीच्या विठ्ठल मंदिर समोरील गेस्ट हाऊस मधील तळ मजला सद्या रिकामा आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मध्ये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करणेची तरतुद आहे. मालमत्ता भाडयाने दयावयाची झालेस कलम ७९ (ड) मध्ये जो मोबदला घेवुन, महानगरपालिका मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल. पटटयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरण करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य , भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये. अशी तरतुद आहे. उक्तं प्रकरणी शासनाने नाममात्र भाडयाने मंडळा तर्फे दवाखाना चालु असेपर्यंत जागा देणेस मान्यता दिली आहे.

उक्त वस्तुस्थिती पाहता अध्यक्ष् श्री. १००८ भ. महावीर जयंती उत्सव मंडळ इचलकरंजी यांचे मागणीप्रमाणे मोठे तळे येथील जागे ऐवजी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात गेस्ट हाऊस तळमजला हॉल सद्या रिकामा असलेने मागणी केला आहे.

उक्त् प्रकरणी नगररचना विभागाने जमिनीच्या रेडिरेकनर दराच्या ८% व इमारतीच्या बांधकामाच्या रेडिरेकनर दराच्या १०% व इतर देखभाल दुरुस्तीसह प्रती चौ.मी.प्रती. महा. ५५.७० इतके भाडे निश्चित केले आहे. भाडयाने द्यावयाची जागा ही १४१.५० चौ. मी. इतकी आहे. या जागेचे एकुण मासिक भाडे प्रती. महा रु. ७८८१.५५ व अन्य कर इतके होते. भाडे निश्चिती करताना नगररचना विभागाने शासन सुधारीत समितीसमोर ठेवुन त्याची मान्यता घेणे आवश्यकता आहे असे म्हटले आहे. सोबत नगररचना विभागाने अटी / शर्तीसह टिप म्हणुन १ ते ५ बाबी प्रामुख्याने विचारात घेणेबाबत सुचीत केले आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. २६/०४/२०२३ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतणीकरण) २०२३ ने प्रारुप नियम प्रसिध्द केले आहे. सदर नियमावलीमध्ये मा. आयुक्तसो यांचे अध्यक्षतेखाली भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती निश्चित केली आहे. उक्त प्रकरणी प्रारुप नियमाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत इकडे अहवाल सादर केला असुन नगररचनाकारसो यांनी ठरविलेले भाडे प्रमाणे ३ वर्षाकरीता सि.स.न. ४८३ कै. गणपतराव जोंग् गेस्ट हाऊस येथील तळ मजला भ. महावीर धर्मादाय दवाखाना यांना देणेकामी प्रशासकीय ठराव करणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३४/२०२३** **दि.०४/९/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवून नगररचनाकार यांनी ठरवून दिलेले भाडे प्रती. महा रु. ७८८१.५५ व अन्य कर याप्रमाणे ३ वर्षे मुदतीसाठी अध्यक्ष श्री. १००८ भ. महावीर जयंती उत्सव मंडळ, इचलकरंजी यांना महानगरपालिका अटी / शर्तीनुसार महानगरपालिका मालकीचे सि.स.नं. ४८३ कै. गणपतराव जोंग् गेस्ट हाऊस येथील तळ मजला येथील १४१.५० चौ. मी. जागा देणेस मंजुरी देणेत येत असून यानुसार अध्यक्ष श्री. १००८ भ. महावीर जयंती उत्सव मंडळ, इचलकरंजी यांचेकडून भाडेपट्टा करार करुन घेणेत यावा.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात दिव्यांग निधी वितरीत करणेबाबत.

प्रस्ताव :

महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत ५% राखीव निधी दिव्यांग कल्याणकारी योजना या हेडखाली महाराष्ट्र शासन क्रमांक संकीर्ण /दिव्यांग २०१८/प्र.क्र.५२/१८/नवि २८/दि.१०/५/२०१८ अन्वये दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला निधी नागरी भागातील दिव्यांगासाठी खर्च करणेसाठी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही केली जाते. सन २०२३/२०२४ सालासाठी दै.महासत्ता व दै.राष्ट्रगीत या वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रकटन करून दिव्यांगांचे ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. मुदतीत १६७० अर्ज प्राप्त झाले आहेत. प्राप्त १६७० लाभार्थी यांना प्रती लाभार्थी लाभ रु.रु.१,८००/- प्रमाणे वितरण करणेकामी प्रथम ४०० लाभार्थी यांना रु.७,२०,०००/- इतकी रक्कम वितरित करणेस व त्यानंतर १२६१ लाभार्थी यांना रु.२२,६९,८००/- इतका निधी वितरीत करणेस दि.२४/८/२०२३ नुसार मान्यता मिळाली असून त्यानुसार एकूण १६६१ लाभार्थी यांचे खातेवर प्रती लाभार्थी रु.१८००/- प्रमाणे रक्कम लाभार्थी यांचे बँक खातेमध्ये जमा करणेत आली आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३५/२०२३** **दि. ०४/९/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी घेवून महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत ५% राखीव निधी दिव्यांग कल्याणकारी योजना या हेडखाली महाराष्ट्र शासन क्रमांक संकीर्ण /दिव्यांग २०१८/प्र.क्र.५२/१८/नवि २८/दि.१०/५/२०१८ अन्वये दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या निधीतून दि.२४/८/२०२३ रोजी देणेत आले मान्यतेनुसार पात्र लाभार्थी यांचे बँक खातेवर प्रती लाभार्थी रु.१८००/- प्रमाणे रु.२९,८९,८००/- इतका निधी जमा केलेबाबतच्या कार्यवाहीस मंजुरी देणेत येत आहे.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : महानगरपालिकेमार्फत पार पाडावयाच्या कामाकाजासाठी महानगरपालिकेचे उपायुक्त/ सहा आयुक्त यांना आयुक्तांचे नियंत्रण व पुनरिक्षणाच्या अधिन राहुन नमूद विभागाचे अधिकारी म्हणुन घोषित करणे.

प्रस्ताव :

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार आयुक्त यांना प्रदान केलेले किंवा त्यांचेकडे सोपविलेले किंवा त्यामध्ये निहीत असलेले कोणतेही अधिकार, कर्तव्ये किंवा कामे ही उक्त अधिनियमातील कलम ६९ नुसार महानगरपालिकेच्या अन्य कोणत्याही अधिकारी यांना प्रदान करता येतात आणि उक्त अधिनियमाच्य कलम ४९ नुसार महानगरपालिका उपायुक्त यांना, आयुक्त आपले अधिकार व कर्तव्यापैकी वेळोवेळी त्यांच्याकडे सोपविल व अशा अधिकाराचा उपायुक्त्/ सहा. आयुक्त नियंत्रण अधिकारी वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४(१) (क) सह ६७(३), ६८ अन्वये संपुर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहीत असल्याच्या बाबीस अनुसरुन तसेच कलम ६९ अन्वये प्राप्त् अधिकारात महानगरपालिकेमार्फत पार पाडावयाच्या कामाकाजासाठी महानगरपालिकेचे उपायुक्त/ सहा आयुक्त यांना आयुक्तांचे नियंत्रण व पुनरिक्षणाच्या अधिन राहुन पुढे दर्शविलेल्या विभागाचे अधिकारी म्हणुन घोषित करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

| नियंत्रण अधिकारी | सोपविण्यात आलेले विभाग |
|---|---|
| डॉ. प्रदीप ठेंगल,<br>उपायुक्त् (मुख्यालय) | १. आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग<br>२. कामगार कल्याण विभाग<br>३. मुख्य् लेखा विभाग<br>४. नगररचना विभाग<br>५. नगरसचिव विभाग<br>६. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग<br>७. माहिती व जनसंपर्क विभाग<br>८. मध्यवर्ती आवक जावक विभाग<br>९. विधी विभाग<br>१०. क्रिडा व सांस्कृतीक विभाग<br>११. वैद्यकीय आरोग्य विभाग (रुग्णालय)<br>१२. पशुशल्य चिकीत्सा विभाग<br>१३. जन्म् मृत्यु नोंदणी विभाग<br>१४. विवाह नोंदणी विभाग (प्रशासकीय सोयीसाठी)<br>१५. प्रभाग समिती कार्यालय अ |
| श्री. तैमुर मुलाणी<br>उपायुक्त् (कर) | १. बांधकाम विभाग<br>२. अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम विभाग<br>३. पाणीपुरवठा विभाग<br>४. विद्युत विभाग<br>५. लेखापरिक्षण विभाग<br>६. पर्यावरण विभाग<br>७. समाजविकास दिव्यांग कल्याण विभाग DAY NULM<br>८. महिला व बालकल्याण विकास विभाग<br>९. आकाशचिन्ह व परवाना विभाग<br>१०. निवडणुक व जनगणना विभाग<br>११. उद्यान व वन संवर्धन विभाग<br>१२. अग्निशमन<br>१३. आपत्ती व्यवस्थापन विभाग (प्रशासकीय सोयीसाठी)<br>१४. प्रभाग समिती कार्यालय क<br>१५. प्रभाग समिती कार्यालय ड |

CamScanner

| | |
|---|---|
| श्री. सोमनाथ आढाव<br>प्रभारी उपायुक्त्<br>(प्रशासकीय सोयीसाठी) | १. करमुल्यांकन व संकलन विभाग<br>२. घनकचरा व्यवस्थापन विभाग<br>३. माहीती व तंत्रज्ञान विभाग<br>४. मालमत्ता व्यवस्थापन विभाग, श्रीमंत ना.बा. घोरपडे नाटयगृह<br>५. मार्केट विभाग<br>६. मध्यवर्ती भांडार विभाग<br>७. ग्रंथालय विभाग<br>८. प्रभाग समिती कार्यालय ब |
| श्री. केतन गुजर<br>प्रभारी सहा. आयुक्त् | १. अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम विभाग<br>२. वाहन विभाग<br>३. सुरक्षा विभाग<br>४. ग्रंथालय विभाग<br>५. जनरल रेकॉर्ड / अभिलेख |

**प्रशासकीय ठराव क्र. ३६ /२०२३** **दि. ०५/०९/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४(१) (क) सह ६७(३), ६८ अन्वये संपुर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहीत असल्याच्या बाबीस अनुसरुन तसेच कलम ६९ अन्वये प्राप्त् अधिकारात महानगरपालिकेमार्फत पार पाडावयाच्या कामाकाजासाठी महानगरपालिकेचे उपायुक्त/ सहा आयुक्त यांना आयुक्तांचे नियंत्रण व पुनरिक्षणाच्या अधिन राहुन वरील प्रमाणे प्रस्तावात दर्शविलेल्या विभागाचे अधिकारी म्हणुन घोषित करणेस मंजुरी देणेत येत असून यानुसार आदेश तयार करुन निर्गमित करणेत यावेत.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : महानगरपालिकेचे विविध विभागाकडील प्रदान प्रमाणके/ धनादेश स्वाक्षरीसाठी नियंत्रण अधिकारी यांना प्राधिकृत करण्याबाबत तसेच विकास कामांचे संविदा करारपत्रावर मुद्रा लावणेकामी अधिका-यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.

प्रस्ताव :

संदर्भ — १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४ (१) (क) सह ६७ (३), ६८
२. जा.क्र. आयुक्त् कार्या/०२/१३६/२०२३ दि. ०५/०९/२०२३ चे आदेश
३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८४ व परिशिष्ठ चार
४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ नियम १ (२)

उपरोक्त संदर्भ क्र. १ वरील अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेमार्फत पार पाडावयाच्या कामकाजासाठी महानगरपालिकेचे उपायुक्त / सहा. आयुक्त यांना संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये आयुक्तांचे नियंत्रण व पुनरीक्षणाचे अधीन राहुन विभागनिहाय नियंत्रण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

मुख्य्य लेखाधिकारी यांचेसह नियंत्रण अधिकारी यांना, संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये सोपविण्यात आलेल्या त्यांचे अधिनस्त् विभागाकडील विविध स्वरुपाची प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश संदर्भ क्र. ३ वरील तरतुदीनुसार स्वाक्षरीत करण्यासाठी प्राधिकृत करणेबाबत. तथापि, श्री. केतन गुजर, प्रं. सहा आयुक्त् यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विभागाकडील ग्रंथालय व अनाधिकृत बांधकाम हे विभाग वगळुन प्रदान प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश हे उपायुक्त् (मुख्यालय) यांनी स्वाक्षरीत करणेबाबत तसेच धनादेशावर स्वाक्षरी करताना व देयके आदा करताना सर्व लेखा नियमांचे व महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचे पालन कटाक्षाने करण्याची जबाबदारी मुख्य् लेखाधिकारी व संबंधीत नियंत्रण अधिकारी यांची राहील. स्वाक्षरी केलेल्या धनादेशाचे एकत्रित विविरणपत्र प्रत्येक आठवडयास निम्न् स्वाक्षरीकार यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

त्याचप्रमाणे संदर्भ क्र. ४ वरील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन वेगवेगळया स्वरुपांच्या कामांची (संविदा) करारपत्रावर मुद्रा लावण्याबददल स्वाक्षरी करण्यासाठी वरील परिच्छेदानुसार धनादेश स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या उपायुक्त यांना प्राधिकृत करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३७ /२०२३** **दि.०६/०९/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन मुख्य लेखाधिकारी यांचेसह नियंत्रण अधिकारी यांना, संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये सोपविण्यात आलेल्या त्यांचे अधिनस्त् विभागाकडील विविध स्वरुपाची प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश संदर्भ क्र. ३ वरील तरतुदीनुसार स्वाक्षरीत करण्यासाठी प्राधिकृत करणेत येत आहे. तथापि, श्री. केतन गुजर, प्र. सहा आयुक्त् यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विभागाकडील ग्रंथालय व अनाधिकृत बांधकाम हे विभाग वगळुन प्रदान प्रमाणके व त्यानुसार आदा करावयाचे धनादेश हे उपायुक्त् (मुख्यालय) यांनी स्वाक्षरीत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच संदर्भ क्र. ४ वरील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन वेगवेगळया स्वरुपांच्या कामांची (संविदा) करारपत्रावर मुद्रा लावण्याबद्दल स्वाक्षरी करण्यासाठी वरील परिच्छेदानुसार धनादेश स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या उपायुक्त यांना प्राधिकृत करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

धनादेश स्वाक्षरी करणे तसेच संविदांच्या करारपत्रावर मुद्रा लावणेसंबधीचे यापुर्वीचे सर्व आदेश निष्प्रभावित करण्यात येत असून यानुसार आदेश तयार करुन निर्गमित करणेत यावेत.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**